• वर्ष : ०३ • अंक : २८३ • पुणे • शनिवार, दि. ०४ जुलै २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**







# पावसाचा हाहाकार; बाहेर पडताना जरा जपून!

## मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत; नागरिकांनी सतर्क राहणेच काळाची गरज

पावसाळा हा आनंद देणारा ऋतू असला तरी गेल्या काही दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने अनेक शहरांमध्ये आणि ग्रामीण भागात अक्षरशः हाहाकार माजवला आहे. रस्ते जलमय झाले आहेत, वाहतूक विस्कळीत झाली आहे, झाडे कोसळण्याच्या घटना वाढल्या आहेत, तर काही ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक नागरिकाने घराबाहेर पडताना अधिक काळजी घेणे आवश्यक आहे.

सकाळी कामासाठी, शाळा-महाविद्यालयासाठी किंवा इतर कारणांसाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यांवर साचलेल्या पाण्यामुळे खड्डे दिसत नाहीत. त्यामुळे दुचाकीस्वारांचा तोल जाऊन अपघात होण्याचे प्रमाण वाढते. चारचाकी वाहनचालकांनाही पाण्याखाली गेलेल्या रस्त्यांमुळे वाहन बंद पडण्याचा धोका असतो. त्यामुळे वाहन चालवताना वेगावर नियंत्रण ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

पावसामुळे अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित होतो. विजेचे खांब, तुटलेल्या तारा किंवा पाण्यात पडलेले विद्युत उपकरण यांच्या संपर्कात येणे जीवघेणे ठरू शकते. त्यामुळे पाणी साचलेल्या भागातून जाताना विशेष दक्षता घ्यावी. शक्यतो अशा ठिकाणी जाणे टाळावे.

मुसळधार पावसामुळे नद्या, ओढे आणि धरणांच्या पाण्याच्या पातळीत झपाट्याने वाढ होत असते. अनेक जण पाण्याचा प्रवाह पाहण्यासाठी किंवा छायाचित्रे काढण्यासाठी धोकादायक ठिकाणी जातात. मात्र हा निष्काळजीपणा जीवावर बेतू शकतो. प्रशासनाने बंदी घातलेल्या ठिकाणी जाणे टाळावे आणि आपला तसेच कुटुंबीयांचा जीव धोक्यात घालू नये. शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. लहान मुलांना पाण्यात खेळण्यापासून रोखावे. छत्री, पावसाळी कोट, आवश्यक औषधे आणि पिण्याचे स्वच्छ पाणी सोबत ठेवावे. घराबाहेर पडण्यापूर्वी हवामानाचा अंदाज जाणून घेणेही आवश्यक आहे.

महानगरपालिका आणि स्थानिक प्रशासनाकडून नागरिकांना वेळोवेळी सूचना दिल्या जात आहेत. त्या सूचनांचे पालन करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदत क्रमांकांची माहिती जवळ ठेवावी. तसेच अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे.

पावसाळ्यात संसर्गजन्य आजारांचे प्रमाणही वाढते. दूषित पाणी, अस्वच्छ परिसर आणि डासांची वाढ यामुळे ताप, डेंग्यू, मलेरिया, अतिसार यांसारखे आजार उद्भवू शकतात. त्यामुळे स्वच्छतेची काळजी घेणे, उकळलेले किंवा शुद्ध पाणी पिणे आणि परिसरात पाणी साचू न देणे आवश्यक आहे.

पावसाचा आनंद जरूर घ्या, पण सुरक्षिततेशी तडजोड करू नका. काही क्षणांचा निष्काळजीपणा आयुष्यभराची हानी ठरू शकतो. त्यामुळे घराबाहेर पडताना हवामानाची माहिती घ्या, वाहन सावकाश चालवा, अनावश्यक प्रवास टाळा आणि प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करा.

"सावध नागरिक, सुरक्षित प्रवास" हा मंत्र लक्षात ठेवला, तर पावसाळ्यातील अनेक धोके टाळता येतील. पाऊस निसर्गाचा आशीर्वाद आहे; मात्र त्याचवेळी तो संकटाचे रूपही धारण करू शकतो. म्हणूनच "पावसाचा हाहाकार... बाहेर पडताना जरा जपून!" हे प्रत्येकाने लक्षात ठेवण्याची गरज आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### डीजीपीयूमध्ये उद्योग-शैक्षणिक सहकार्याला बळ

पुणे (आरंभ पर्व) : डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटीच्या ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी (DGPU) ने उद्योगाभिमुख शिक्षणाला अधिक बळकटी देण्यासाठी आपल्या स्कूल ऑफ फार्मसी अँड रिसर्च (DPGU SPR) मध्ये विशेष अकॅडेमिया-इंडस्ट्री इंटरॅक्शन सत्राचे आयोजन केले. या सत्रात मॅनकाइंड फार्मा लिमिटेडचे सिनियर प्रेसिडेंट - ऑपरेशन्स अभय कुमार श्रीवास्तव यांनी विद्यार्थी आणि प्राध्यापकांशी संवाद साधत औषधनिर्माण उद्योगातील बदलते प्रवाह, संधी आणि अपेक्षांबाबत मार्गदर्शन केले. शैक्षणिक गुणवत्ता, संशोधनाधिष्ठित शिक्षण, नवोपक्रम आणि उद्योग सहकार्यावर भर देणाऱ्या डीजीपीयूच्या स्कूल ऑफ फार्मसी अँड रिसर्चमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगविश्वाशी जोडण्यासाठी अशा संवादात्मक उपक्रमांचे नियमित आयोजन केले जाते. या सत्रात प्राध्यापक विकास, उद्योगाच्या गरजांनुसार अभ्यासक्रम विकसित करणे, कौशल्यविकास, संयुक्त संशोधन, इंटर्नशिप, प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच औषधनिर्माण क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा वाढता वापर अशा विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

### "एक होतं माळीण" चित्रपटाचा थरकाप उडवणारा टीजर



पुणे (आरंभ पर्व) : माळीण गाव हे पुणे जिल्ह्याच्या आंबेगाव तालुक्यातील एक गाव. पाऊस पडावा म्हणून वरूण राजाची प्रार्थना करणारे माळीण गावातील ग्रामस्थ आदल्या दिवशी रात्री गाढ झोपी गेले आणि त्याच रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे संपूर्ण गावच त्या पावसात वाहून गेलं. कल्पनाही करता येणार नाही अशी भयावह परिस्थिती निर्माण झाली. याच सत्यघटनेवर आधारित "एक होतं माळीण" हा चित्रपट येत्या २४ जुलैला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होत असून नुकताच या चित्रपटाचा टीजर सोशल मीडियावर लाँच करण्यात आला आहे. ड्रीम डॉट क्रिएशन प्रोडक्शनच्या संतोष जगन्नाथ म्हात्रे यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे, तर रुपेश राणे, अरूण कोंजे, दत्तात्रय गायकर, राजु राणे हे सहनिर्माते आहेत. रॅन स्टुडिओज प्रोडक्शन चे नंदू मेहेर, रुपेश राणे, अरुण कोंजे, अक्षय म्हात्रे व राजु राणे यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. चित्रपटाची संकल्पना, कथा, पटकथा राजु राणे यांची असून दत्तात्रय गायकर आणि राजु राणे यांनी चित्रपटाचे लेखन, संवाद आणि दिग्दर्शन केले आहे.

### भारती एअरटेलचा नेटवर्क कव्हरेजचा विस्तार; कनेक्टिव्हिटी केली मजबूत

जम्मू/श्रीनगर (आरंभ पर्व) : भारती एअरटेलने अमरनाथ यात्रेसाठी आपल्या मोबाईल नेटवर्कचा विस्तार केल्याची घोषणा केली आहे. यामुळे यात्रेकरू, सुरक्षा दल आणि स्थानिक प्रशासनाला अधिक चांगली आणि विश्वासार्ह मोबाईल कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. एअरटेलने चंदनवाडी, पिस्सू टॉप आणि बेताब व्हॅली येथे नवीन मोबाईल नेटवर्क साइट्स सुरू केल्या आहेत. त्यामुळे पहलगाम मार्गावर आता मजबूत नेटवर्क उपलब्ध झाले आहे. यापूर्वीच बालटाल मार्गावर एअरटेलची सेवा उपलब्ध होती. या विस्तारामुळे पवित्र अमरनाथ गुहेपर्यंतच्या संपूर्ण प्रवासात यात्रेकरूंना अखंड मोबाईल कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. अमरनाथ यात्रेदरम्यान दळणवळणाची सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी एअरटेलने संबंधित सरकारी यंत्रणा आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने हे नेटवर्क उभारले आहे. या विस्तारित नेटवर्कमुळे लाखो भाविकांना विश्वासार्ह व्हॉइस आणि डेटा सेवा मिळेल.

# सात हॉटेल परवाने निलंबित

## पुण्यातील हॉटेल-रेस्टॉरंट चालकांना एफडीएचा दणका !

- तपासणीत अस्वच्छता, अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे उल्लंघन
- काही ठिकाणी मुदतबाह्य अन्नसाठा आढळून आल्याने ७ आस्थापनांचे परवाने तात्काळ निलंबित.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी भेसळयुक्त अन्न देणाऱ्या, अस्वच्छ असणाऱ्या हॉटेल-रेस्टॉरंट चालकांविरुद्ध कारवाईचे आदेश दिले आहेत.

राज्यभरात अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी हॉटेल-रेस्टॉरंटचे तपासणी करत आहेत. त्यात अनेक ठिकाणी ग्राहकांच्या जीवनाशी खेळ खेळले जात आहे. अस्वच्छ अन्न, भेसळ, कलरचा वापर केला जात असल्याचे आढळून आले आहेत. पुण्यात सात हॉटेल-रेस्टॉरंटचे परावने निलंबित करण्यात आले आहेत.



### तुम्हाला तक्रार करायची आहे का?

आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार ही तपासणी मोहीम सुरू आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. तसेच हॉटेल व्यावसायिकांनी स्वच्छता, अन्न सुरक्षा नियम आणि मोफत शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अन्नाच्या दर्जाबाबत तक्रारींसाठी नागरिकांनी 1800222365 या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असेही प्रशासनाने म्हटले आहे.

अन्न व औषध प्रशासनाने 'Safe Food, Safe Drug, Safe Maharashtra' मोहिमेअंतर्गत पुणे विभागात 1 ते 3 जुलैदरम्यान 70 हॉटेल व रेस्टॉरंटची तपासणी केली. या तपासणीत अस्वच्छता, अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे उल्लंघन तसेच काही ठिकाणी मुदतबाह्य अन्नसाठा आढळून आल्याने 7 आस्थापनांचे परवाने तात्काळ निलंबित करण्यात आले.

**'या' हॉटेलवर कारवाई :** निलंबित आस्थापनांमध्ये हॉटेल ग्रँड पुरंदर सिंहगड रोड, क्राऊन बेकर्स सिंहगड रोड, मे. अ‍ॅग्रोटीस केटरिंग प्रा. लि. ता. आंबेगाव, जि. पुणे, बरकत बिर्याणी हाऊस वाघोली पुणे, रॉयल बिर्याणी हाऊस वाघोली पुणे आणि नॅशनल 360 बावधन, पुणे यांचा समावेश आहे.



### गांजाची लागवड करणाऱ्यावर कारवाई

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

तांबे ता. जुन्नर येथे (दि.०१) घराच्या शेजारी हिरव्या नेटच्या आडोश्याला शेतात अंमली पदार्थ असणाऱ्या गांजाची झाडे लावल्याचे जुन्नर पोलिसांना आढळून आले. झाडे लावणाऱ्या मुरलीधर धोंडु जोशी याचे विरुद्ध पोलिसांनी कारवाई केली आहे. यात सुमारे १९०० ग्रॅम वजनाची गांजाची झाडे आढळून आली असल्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रेय गुंड यांनी सांगितले.

आरोपीने घराच्या शेजारी हिरव्या नेटच्या आडोश्याला शेतामध्ये गांजाची झाडे लावल्याचे आढळून आल्याने पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन त्याचे विरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापारावर परीणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ कलम २० (ब) ii (अ), ८ (ब) नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मोरे, सहायक फौजदर गिजरे,हवालदार महेश भालेराव, पोलिस शिपाई दादा पावडे, अमोल सातपुते,कैलास केंद्रे, श्रीराम शिंदे, दीपक वणवे यांचे पथकाने केली आहे. जुन्नर पोलीस ठाण्यात अशा प्रकारे अमली पदार्थ वनस्पतींची लागवड व विक्री करु नये.याबाबत माहिती काढून कठोर कायदेशीर कारवाई करण्याची माननीय पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांचे आदेश असून यापुढे अशीच कारवाई सुरू राहणार आहे.



### येरवडा कारागृह अधिकारी-कर्मचारी व कुटुंबीयांसाठी आरोग्य शिबिर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रीय डॉक्टर दिनाचे औचित्य साधत सह्याद्री हॉस्पिटल, शास्त्रीनगर, येरवडा (मणिपाल हॉस्पिटल्स नेटवर्क) यांच्या वतीने येरवडा मध्यवर्ती कारागृह आणि येरवडा खुले कारागृह यांच्या संयुक्त विद्यमाने कारागृहातील अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी दोन दिवसीय मोफत आरोग्य तपासणी व वैद्यकीय सल्ला शिबिराचे आयोजन करण्यात आले. १ व २ जुलै २०२६ या कालावधीत सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कारागृह विभागातील अधिकारी व कर्मचारी हे चोवीस तास जबाबदारीचे कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी व्हावी, विविध आजारांचे लवकर निदान व्हावे आणि त्यांच्या कुटुंबीयांनाही दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मा. डॉ. सुहास वारके (आयपीएस), अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, मा. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, तसेच कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे होते. सह्याद्री हॉस्पिटलच्या संचालिका नेहा सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयाच्या तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या पथकाने शिबिराचे उत्कृष्ट नियोजन केले.

# धायरी फाट्यावरील कचरा हटवला

## दै. आरंभ पर्वच्या वृत्तानंतर झोपलेले प्रशासन जागी : महापालिकेची तातडीची कारवाई

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

धायरी फाटा परिसरात रस्त्यावर साचलेल्या कचऱ्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत असल्याची बाब दैनिक आरंभपर्वने वृत्तातून उघड केली होती. या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरत होती तसेच आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली होती. या वृत्तानंतर प्रशासनाने तातडीने दखल घेत संबंधित ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवून कचरा हटविला.

ह्या प्रभागाच्या नगरसेविका कोमल सारंग नवले यांनी महानगरपालिकेला या समस्येबाबत कळविले. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही याकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत व्यक्त केली होती. त्यानंतर महापालिकेने त्वरित पथक पाठवून परिसरातील कचरा साफ केला आणि परिसर स्वच्छ करण्यात आला.




दैनिक आरंभपर्व
02 Jul 2026 - Page 3
धायरी फाटा येथे रस्त्यावर कचऱ्याचे साम्राज्य
महापालिकेच्या दुर्लक्षामुळे नागरिक संतप्त

दै. आरंभ पर्व इम्पॅक्ट

या कारवाईत आरोग्य निरीक्षक शुभम डोळस यांनी पुढाकार घेतला. स्वच्छता कर्मचाऱ्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम करत संपूर्ण परिसरातील कचरा हटविला. तसेच भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत यासाठी नियमित स्वच्छता राखण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

प्रशासनाने नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, कचरा योग्य ठिकाणीच टाकावा आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. तसेच नागरिकांनीही स्वच्छतेबाबत जागरूक राहून प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक आहे. असे मनपा प्रशासनाने कळवले आहे. दरम्यान, या तातडीच्या कारवाईमुळे स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, दैनिक आरंभपर्वच्या पाठपुराव्याचे तसेच नगरसेविका सौ . कोमल नवले तसेच महापालिका प्रशासनाच्या तत्परतेचे कौतुक केले आहे. नागरिकांनी भविष्यातही अशा समस्यांवर तत्काळ उपाययोजना व्हाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# कार्य हीच ओळख... म्हणजे सुभाषभाऊ नाणेकर!

## वाढदिवस अभिष्टचिंतन



• शब्दांकन : विजय मते •
मंडल अध्यक्ष, धायरी-शिवणे,
निखिल धावडे,
अध्यक्ष भाजपा युवा मोर्चा,
खडकवासला विधानसभा

**(दै. आरंभ पर्व)**

लोकप्रतिनिधी हा केवळ एखाद्या पदाचा मानकरी नसतो, तर तो जनतेच्या विश्वासाचा आणि विकासाच्या संकल्पनेचा वाहक असतो. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होत, अभ्यासपूर्ण पद्धतीने प्रश्न मांडणारे, विकासाला सर्वोच्च प्राधान्य देणारे आणि प्रत्येक नागरिकाशी आपुलकीचे नाते जपणारे पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक मा. सुभाषभाऊ नाणेकर हे असेच एक अभ्यासू आणि लोकाभिमुख नेतृत्व आहे.

उत्तमनगर गावचे सरपंच म्हणून त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. गावाच्या विकासासाठी सातत्याने केलेल्या कामामुळे त्यांनी नागरिकांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्यांच्या पत्नींना पंचायत समिती सदस्य म्हणून जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली. समाजकारण आणि जनसेवेचा हा प्रवास अधिक व्यापक होत गेला आणि जनतेच्या प्रेम, विश्वास व आशीर्वादाच्या बळावर सुभाषभाऊ पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक म्हणून निवडून आले.

सुभाषभाऊंच्या कार्यपद्धतीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कोणताही विषय सखोल अभ्यासाशिवाय न मांडणे. प्रत्येक प्रश्नाची वस्तुस्थिती जाणून घेणे, प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा करणे आणि त्यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न करणे, ही त्यांची कार्यशैली आहे.

गोरगरिबांची अनेक कामे त्यांनी प्रामाणिकपणे मार्गी लावली असून, त्यांच्या अडचणी स्वतःच्या समजून सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. प्रभाग क्रमांक ३३ मधील विकासकामांसाठी त्यांची धडपड आजही अविरत सुरू आहे. समाविष्ट गावांतील नागरिकांना मालमत्ता करासंदर्भातील (प्रॉपर्टी टॅक्स) न्याय मिळावा, वाहतूक कोंडीची समस्या कायमस्वरूपी कमी व्हावी, नागरिकांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा मिळावा, तसेच मूलभूत नागरी सुविधा अधिक सक्षम व्हाव्यात यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत.

प्रभागाच्या विकासासाठी त्यांनी मांडलेली भूमिका आणि केलेला पाठपुरावा निश्चितच कौतुकास्पद आहे. राजकारण म्हणजे केवळ सत्ता नव्हे, तर जनतेचा विश्वास आणि विकासाची जबाबदारी असते, हे सुभाषभाऊंनी आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे.

संयमी स्वभाव, अभ्यासपूर्ण मांडणी, जनतेशी जिव्हाळ्याचे नाते आणि विकासाची स्पष्ट दृष्टी या गुणांमुळे त्यांनी नागरिकांच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक ३३ चा विकास अधिक वेगाने, नियोजनबद्ध आणि सर्वसमावेशकपणे होत राहील, असा ठाम विश्वास नागरिकांच्या मनात आहे. मा. सुभाषभाऊ नाणेकर यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा! त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड जनसेवेची ऊर्जा आणि सार्वजनिक जीवनात निरंतर यश लाभो, हीच सदिच्छा.

### जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे टीसीएस सोमवारी (दि.६) रोजगार मेळावा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या वतीने टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) कंपनीसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन सोमवार, ६ जुलै २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजल्यापासून करण्यात आले आहे. हा रोजगार मेळावा नऱ्हे येथील डॉ. सुधाकरराव जाधवर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, परिसर क्रमांक २ येथे होणार आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दूल जाधवर यांनी दिली. या रोजगार मेळाव्यात बॅक ऑफिस ऑपरेशन्स आणि डेटा प्रोसेसिंग ट्रान्झॅक्शन्स या पदांसाठी भरती केली जाणार आहे. बी.कॉम., बी.ए., बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीएएफ, बीबीआय तसेच बी.एस्सी. (सीएस/आयटी) या शाखांमधून २०२४, २०२५ आणि २०२६ मध्ये पदवी प्राप्त केलेले उमेदवार या मेळाव्यासाठी पात्र आहेत. उमेदवारांकडे कमाल सहा महिन्यांचा कामाचा अनुभव असावा. वयोमर्यादा १८ ते २८ वर्षे असून कोणतेही सक्रिय बॅकलॉग नसावेत. तसेच २४x७ शिफ्ट आणि नाईट शिफ्टमध्ये काम करण्याची तयारी आवश्यक आहे. ॲड. शार्दूल जाधवर म्हणाले, रोजगार मेळाव्यात सहभागी होणाऱ्या उमेदवारांची ॲप्टिट्यूड टेस्ट व मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. ०४ जुलै २०२६


## थोडक्यात पण महत्वाचे



## एचएमएचचा पुण्यातील ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर विस्तारला

- शिवाजीनगरात २४ हजार चौरस फुटांच्या नव्या कार्यालयात स्थलांतर; संशोधन आणि नाविन्यपूर्ण विकासाला मिळणार चालना

**पुणे (आरंभ पर्व) :** के-१२ शिक्षण तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी एचएमएचने पुण्यातील आपल्या ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (जीसीसी) च्या विस्ताराची घोषणा केली आहे. वाढत्या संशोधन, तंत्रज्ञान विकास आणि जागतिक सहकार्याला चालना देण्यासाठी कंपनीने शिवाजीनगर येथील नव्या आणि अधिक प्रशस्त कार्यालयात स्थलांतर केले आहे. २४ हजार चौरस फुटांमध्ये उभारण्यात आलेल्या या नव्या कार्यालयात २३० हून अधिक कर्मचाऱ्यांसाठी आसनक्षमता, आधुनिक सहयोगी (कोलॅबोरेटिव्ह) आणि हायब्रीड कार्यक्षेत्रे तसेच भविष्यातील विस्तारासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. यामुळे पुणे येथील टीमला नव्या प्रकल्पांवर अधिक प्रभावीपणे काम करता येणार आहे. एचएमएच टेक इंडियाच्या सॉफ्टवेअर अभियांत्रिकी विभागाच्या वरिष्ठ उपाध्यक्ष आणि कंट्री मॅनेजर जया वाधवानी यांनी सांगितले की, पुणे केंद्राची यशोगाथा ही जागतिक स्तरावरील प्रभावी सहकार्याची आहे. नव्या कार्यालयाची रचना अधिक चांगला समन्वय, सर्जनशीलता आणि सांघिक कार्याला प्रोत्साहन देणारी असून, यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी अधिक परिणामकारक शैक्षणिक उपाय विकसित करण्यास मदत होईल.

## ‘रक्तांचल 3’चा दमदार फर्स्ट लूक प्रदर्शित; लवकरच होणार प्रदर्शित




**मुंबई (आरंभ पर्व) :** Amazon MX Player ने आपल्या लोकप्रिय राजकीय गुन्हेगारी थरारमालिका रक्तांचलच्या तिसऱ्या पर्वाचा दमदार फर्स्ट लूक प्रदर्शित केला आहे. सत्य घटनांपासून प्रेरित असलेल्या या मालिकेचा तिसरा सिझन लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून तो विनामूल्य स्ट्रीमिंगसाठी उपलब्ध होणार आहे. रितम श्रीवास्तव दिग्दर्शित या मालिकेत क्रांती प्रकाश झा, निकितीन धीर, राजेश कुमार, करण पटेल, विक्रम कोचर आणि माही गिल यांच्या प्रमुख भूमिका आहेत. पूर्वांचलच्या पार्श्वभूमीवर उलगडणाऱ्या या कथेत विजय सिंग आणि वसीम खान यांच्यातील सत्तासंघर्ष अधिक तीव्र आणि धोकादायक स्वरूपात पाहायला मिळणार आहे. २०२० मध्ये पहिला सिझन प्रदर्शित झाल्यानंतर या मालिकेला मोठा प्रेक्षकवर्ग लाभला. आगामी तिसऱ्या पर्वात बदलती समीकरणे, निष्ठेची परीक्षा, सूड आणि सत्तेचा संघर्ष यामुळे कथा अधिक रोमांचक व गडद वळण घेणार असल्याचे फर्स्ट लूकमधून स्पष्ट होते. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरचे कंटेंट प्रमुख अमोघ दुसाद यांनी सांगितले की, रक्तांचल ही व्यासपीठावरील सर्वाधिक लोकप्रिय गुन्हेगारी मालिका असून तिसऱ्या पर्वात वसीम खान आणि विजय सिंग यांच्या संघर्षाची पार्श्वभूमी अधिक सखोलपणे उलगडली जाणार आहे. दिग्दर्शक रितम श्रीवास्तव यांनी सांगितले की, या सिझनमध्ये पात्रांच्या भावनिक आणि मानसिक संघर्षावर अधिक भर देण्यात आला असून कथानक पूर्वीपेक्षा अधिक गडद, तीव्र आणि वैयक्तिक स्वरूपाचे असेल. ‘रक्तांचल 3’ लवकरच केवळ Amazon MX Player वर विनामूल्य स्ट्रीमिंगसाठी उपलब्ध होणार असून मोबाइल, कनेक्टेड टीव्ही, प्राइम व्हिडिओ, फायर टीव्ही, जिओटीव्ही आणि एअरटेल एक्सस्ट्रीमवरही पाहता येणार आहे.

### विद्यार्थ्यांच्या आग्रहाने पोलीस निरीक्षक

# उमेश गित्ते झाले ‘सेलिब्रिटी’

## सह्या घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी घातला गराडा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

येरवडा विभागातील पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांचा विद्यार्थ्यांना सह्या देतानाचा व्हिडिओ सध्या समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. अंमलीपदार्थविरोधी जनजागृती, पोलीस-विद्यार्थी संवाद आणि समाजाभिमुख पोलिसिंगचा हा हृद्य क्षण नागरिकांच्या पसंतीस उतरला आहे.

अंमली पदार्थ विरोधी सप्ताहानिमित्त १ जुलै रोजी एका शाळेत विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात राष्ट्रीय डॉक्टर दिनाचे औचित्य साधून नामांकित डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला. तसेच पोलीस बँडने देशभक्तीपर सुमधुर गीतांचे वादन करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. अनेक विद्यार्थ्यांनी आयुष्यात प्रथमच पोलीस अधिकारी आणि पोलीस बँड इतक्या जवळून पाहिल्याने त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. कार्यक्रम संपल्यानंतर घडलेला एक प्रसंग सर्वांच्या लक्षात राहिला. काही विद्यार्थ्यांनी पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्याकडे येत त्यांच्या हातात पेन दिला आणि "ऑटोग्राफ प्लीज" अशी विनंती केली.



सुरुवातीला क्षणभर गोंधळलेल्या गित्ते यांच्या लक्षात आले की, विद्यार्थी त्यांच्या तळहातावर सही घेण्यासाठी उत्सुक आहेत. त्यानंतर त्यांनी कोणताही विलंब न करता विद्यार्थ्यांच्या तळहातावर प्रेमाने सह्या करण्यास सुरुवात केली.

एका विद्यार्थ्याने सही घेतल्यानंतर इतर विद्यार्थ्यांमध्येही उत्साह संचारला आणि काही क्षणांतच सह्या घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी गित्ते यांच्याभोवती गराडा घातला. प्रत्येक विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर आनंद आणि अभिमान स्पष्टपणे दिसत होता. गित्ते यांनीही हसतमुखाने सर्व विद्यार्थ्यांना सह्या दिल्या.



या व्हिडिओमधून पोलीस आणि विद्यार्थ्यांमधील विश्वासाचे नाते, समाजाभिमुख पोलिसिंगची सकारात्मक प्रतिमा आणि जनजागृती उपक्रमांचा प्रभाव अधोरेखित झाला आहे. समाजमाध्यमांवर या व्हिडिओचे मोठ्या प्रमाणात कौतुक होत असून, अनेकांनी पोलीस दलाच्या संवेदनशील आणि मैत्रीपूर्ण भूमिकेचे स्वागत केले आहे.



या अनुभवाबद्दल उमेश गित्ते यांनी समाजमाध्यमांवर भावना व्यक्त करताना म्हटले, "आज अंमलीपदार्थविरोधी सप्ताहानिमित्त शाळेत कार्यक्रम होता. मुलांनी पोलीस अधिकारी आणि पोलीस बँड इतक्या जवळून प्रथमच पाहिला. कार्यक्रमानंतर काही मुलांनी माझ्याकडे ऑटोग्राफ मागितला. त्यांच्या तळहातावर सह्या करताना त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून मलाही क्षणभर मी एखादा सेलिब्रिटी असल्यासारखे वाटले. हा अनुभव आयुष्यभर लक्षात राहील."






## फ्लिपकार्ट GOAT सेलमध्ये Ai+ स्मार्टफोनच्या उत्पादनांवर आकर्षक सवलती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

Ai+ स्मार्टफोनने फ्लिपकार्टच्या GOAT सेलसाठी आपल्या स्मार्टफोन, वेअरेबल्स आणि AIoT उत्पादनांवर विशेष ऑफर्स जाहीर केल्या आहेत. फ्लिपकार्ट प्लस सदस्यांना ३ जुलैपासून सेलमध्ये लवकर प्रवेश मिळणार असून, ४ जुलैपासून हा सेल सर्व ग्राहकांसाठी खुला होणार आहे. या सेलमधील प्रमुख आकर्षण असलेला Ai+ Pulse 2 स्मार्टफोन आतापर्यंतच्या सर्वात कमी ₹8,999 या विशेष किमतीत उपलब्ध होणार आहे. याशिवाय Nova Series, वेअरेबल्स, ऑडिओ उत्पादने आणि टॅबलेट्सवरही विशेष सवलती देण्यात आल्या आहेत. Pulse 2 मध्ये 6.745 इंचांचा HD+ डिस्प्ले, 120Hz रिफ्रेश रेट, Unisoc T7250 ऑक्टा-कोर प्रोसेसर, 50MP AI रिअर कॅमेरा, 8MP फ्रंट कॅमेरा, 6000mAh बॅटरी, 18W फास्ट चार्जिंग आणि Android 16 आधारित NxtQuantum OS देण्यात आले आहे. हा स्मार्टफोन 6GB पर्यंत रॅम, 128GB स्टोरेज आणि 1TB पर्यंत स्टोरेज विस्ताराच्या सुविधेसह उपलब्ध आहे.




- Pulse 2 फक्त ₹8,999 मध्ये; NovaWatch Rotatecam 4G प्रथमच विक्रीसाठी उपलब्ध


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसिने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक रॉकी प्रकाश काजळे व सागर प्रकाश काजळे हे असून त्यांचा संयुक्त खाते क्रमांक ९१७ आहे. सदर जमीन मिळकत त्यांनी आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीमध्ये अन्य तिऱ्हाईत इसमांचे, व्यवस्थापनाचे कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध खरेदीखत, साठेखत, बक्षीसपत्र, लिज, लीन, गहाणखत, ईसार पावती, खरेदी करारनामा आगर अन्य कोणत्याही तबदिलीचे हस्तांतरणाचे दस्त असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत अस्सल कागदपत्रांसह प्रत्यक्ष खालील पत्त्यावर हजर राहून खात्री पटवून द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत ना आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे किंवा संबंधितांनी त्यांचे हक्क व हितसंबद्ध, अधिकार जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशील पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ठ : - गाव मौजे थोरांदळे, ता. आंबेगाव, जि. पुणे. येतील जमीन गट नं. ४३८, क्षेत्र. २२.०० आर, आकार ०.५५ येणेप्रमाणे मिळकत या नोटिसीचा विषय असे.

मा. श्री. सुदर्शन करंडे
ॲडव्होकेट
पत्ता : पनवेल, मुंबई.
मोबा : ९५०३७३५०५०


## पावसाळा सुरू होताच मुलांमध्ये पोटाचे संसर्ग

**पुणे (दै. आरंभ पर्व) :** पावसाळा सुरू होताच मुलांमध्ये ताप, पोटाचे संसर्ग, डासांमुळे होणारे आजार; तसेच दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारांच्या रुग्णसंख्येत वाढ होत असल्याचे निरीक्षण तज्ज्ञांनी नोंदवले आहे. साचलेले पाणी, अस्वच्छ अन्न, दूषित पिण्याचे पाणी आणि अस्वच्छता यामुळे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया, टायफॉइड, गॅस्ट्रोएन्टरायटिस (पोटाचा संसर्ग), कॉलरा आणि लेप्टोस्पायरोसिस यांसारख्या आजारांचा धोका वाढत असल्याने पालकांनी विशेष सतर्क राहण्याची गरज असल्याचे आवाहन करण्यात आले आहे. ‘सूर्या मदर अँड चाइल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल’चे सल्लागार बाल पचनसंस्थातज्ज्ञ डॉ. प्रतीक अगरवाल यांनी सांगितले, की मे आणि जून महिन्यांत पाण्याशी संबंधित समस्या असलेल्या भागांतून येणाऱ्या मुलांमध्ये पोटाच्या संसर्गाच्या रुग्णांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. अनेक मुलांना तीव्र पोटदुखी, उलट्या, जुलाब आणि काही प्रकरणांमध्ये शौचातून रक्त येण्याची तक्रार आढळत आहे. ‘माझ्याकडे रुग्णालयात दर महा सुमारे २५० ते ३०० पोटाच्या संसर्गाचे रुग्ण उपचारासाठी येतात. पैकी दररोज एक ते दोन मुलांना शरीरातील पाणी कमी होणे किंवा काहीही खाता-पिता न आल्यामुळे रुग्णालयात दाखल करावे लागत आहे,’ असे डॉ. अगरवाल यांनी नमूद केले.







## थोडक्यात पण महत्वाचे




### ‘नागरिक सोशल फाउंडेशन’तर्फे ‘आदर्श मंदिर स्पर्धा २०२६’चे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : पुणे हे विद्येचे माहेरघर असण्यासोबतच सांस्कृतिक वारसा आणि मंदिरांचे शहर म्हणूनही ओळखले जाते. मंदिरांमधील संस्कृती जपणे, स्वच्छता, पर्यावरणपूरक उपक्रम आणि उत्तम व्यवस्थापनाद्वारे मंदिरांचा कायापालट करणे या उद्देशाने 'नागरिक सोशल फाउंडेशन'च्या 'भक्ती शक्ती' विभागामार्फत 'आदर्श मंदिर स्पर्धा २०२६' आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती 'नागरिक सोशल फाउंडेशन'च्या वतीने सायली गोडबोले - जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी नागरिक सोशल फाउंडेशनचे संचालक अमेय सप्रे, सीए सर्वेश मेहेंदळे , चंद्रशेखर शिरुडे, पूजा भंडारे, सुधीर जोशी आदी उपस्थित होते. मंदिरं ही केवळ धार्मिक स्थळं नसून ती समाजप्रबोधन आणि शिस्तीची केंद्रे आहेत. जुन्या आणि दुर्लक्षित मंदिरांना पुन्हा प्रकाशझोतात आणणे, मंदिरांविषयी समाजात आस्था निर्माण करणे आणि ही मंदिरे आपल्या सांस्कृतिक वैभवाचा पाया आहेत, हे अधोरेखित करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. ही स्पर्धा १५ जुलै २०२६ ते १५ जानेवारी २०२७ या कालावधीत पार पडणार आहे. स्पर्धा पूर्णतः विनामूल्य आहे. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मंदिरांना रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात येणार आहे. यामध्ये प्रथम पारितोषिक: ३१,०००/- रुपये, द्वितीय पारितोषिक: २१,०००/- रुपये, तृतीय पारितोषिक: ११,०००/- रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक: ७,५००/- रुपये अशी पारितोषिकं असणार आहेत. आपल्या संस्कृतीच्या जतनासाठी आणि मंदिरांच्या आधुनिक व्यवस्थापनासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त मंदिरांनी या स्पर्धेत सहभागी होऊन आपल्या कार्याचा ठसा उमटवावा, असे आवाहन 'नागरिक सोशल फाउंडेशन'तर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी आणि सहभागासाठी इच्छुक मंदिरांनी 9970154167/ 9822848287 या क्रमांकावर 'नागरिक सोशल फाउंडेशन'च्या 'भक्ती शक्ती' विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### श्रद्धांजलीऐवजी आरोग्य जनजागृती; दशक्रियाविधीत अनोखा उपक्रम

जुन्नर (आरंभ पर्व) : जुन्नर तालुका पर्यटन विकास संस्थेचे अध्यक्ष तसेच निसर्ग अभ्यासक यश मस्करे यांचे वडील वनाधिकारी स्व. तुकाराम पांडुरंग मस्करे यांच्या दशक्रियाविधी निमित्त पारंपरिक श्रद्धांजलीपर भाषणांना फाटा देत आरोग्य विषयक जनजागृती व्याख्यानाचे आयोजण केले होते. या अनोख्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी ज्ञानेश्वरीचे पूजन करण्यात आले. ज्येष्ठ कवी उत्तम सदाकाळ यांनी 'बाप' ही हृदयस्पर्शी कविता सादर केली, पसायदानाने सांगता झाली. यानंतर स्मशानभूमी परिसरात वडाचे झाड लावण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. राऊत यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे तरुणांमध्येही हृदयविकाराचे प्रमाण वाढत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. हृदयविकार टाळण्यासाठी नियमित शारीरिक व मानसिक व्यायाम करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच कोणत्याही आजाराकडे दुर्लक्ष न करता तात्काळ वैद्यकीय सल्ला घ्यावा. हृदयविकाराचा झटका किंवा सर्पदंश झाल्यास रुग्णाला योग्य उपचार वेळेत मिळणे अत्यंत महत्त्वाचे असून, रुग्णाला हलवताना विशेष काळजी घ्यावी, असा सल्लाही त्यांनी दिला.

### डॉक्टर दिनानिमित्त विविध क्लिनिकमध्ये डॉक्टरांचा सन्मान



पुणे (आरंभ पर्व) : राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त समाजाच्या आरोग्यासाठी दिवस-रात्र निस्वार्थपणे सेवा बजावणाऱ्या डॉक्टरांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विविध क्लिनिकमध्ये भेट देऊन डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. "रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा" या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात डॉक्टरांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले तसेच त्यांच्या सेवाभावी कार्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ व आमदार भीमराव तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली खडकवासला विधानसभा भारतीय जनता प युवा मोर्चाचे अध्यक्ष विशाल उभे यांनी विविध क्लिनिकना भेट देत डॉक्टरांचा सन्मान केला. यावेळी विशाल उभे म्हणाले की, "समाजाच्या आरोग्याची जबाबदारी समर्थपणे सांभाळणारे डॉक्टर हे खऱ्या अर्थाने समाजाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या निस्वार्थ सेवेमुळे असंख्य रुग्णांना नवजीवन मिळते. त्यांच्या कार्याबद्दल समाजाने कायम कृतज्ञ राहिले पाहिजे." या उपक्रमाद्वारे डॉक्टरांच्या समाजहिताच्या कार्याला सलाम करण्यात आला तसेच त्यांच्या निरोगी समाज उभारणीतील योगदानाबद्दल गौरव व्यक्त करण्यात आला.

### भिवंडीत होमविस्टाचे अत्याधुनिक उत्पादन केंद्र; पारदर्शकतेवर भर

DESIGNCAFE
MORE ROOM FOR JOY

मुंबई / बेंगळुरू (आरंभ पर्व) : भारतातील होम इंटिरिअर्स क्षेत्रात तंत्रज्ञानाधारित आणि संघटित उत्पादन व्यवस्थेला वेग येत असून, होमलेन आणि डिझाइनकॅफेची मूळ कंपनी होमविस्टाने महाराष्ट्रातील भिवंडी येथे ५६ हजार चौरस फुटांचे अत्याधुनिक एकात्मिक उत्पादन व वेअरहाउसिंग केंद्र सुरू केले आहे. या केंद्रामुळे उत्तर आणि पश्चिम भारतातील ग्राहकांना अधिक दर्जेदार, वेगवान आणि पारदर्शक सेवा मिळणार आहे. या सुविधेमुळे प्रथमच होमलेन आणि डिझाइनकॅफे या दोन्ही ब्रँड्सची उत्पादन व्यवस्था एकाच छताखाली आणण्यात आली आहे. प्रगत यंत्रसामग्री, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित उत्पादन प्रणाली आणि प्रत्येक टप्प्याचा मागोवा घेणाऱ्या तंत्रज्ञानामुळे उत्पादनातील अचूकता, गुणवत्ता आणि वेळेत प्रकल्प पूर्ण करण्याची क्षमता वाढणार आहे. भिवंडी येथील केंद्रात प्रगत सीएनसी मशिन्स, स्वयंचलित बीम सॉ, एज-बँडिंग प्रणाली, रोबोटिक फिनिशिंग तंत्रज्ञान आणि कन्व्हेयर-आधारित असेंब्ली लाईन्सचा वापर करण्यात आला आहे. कंपनीच्या एआय-आधारित उत्पादन प्रणालीमुळे मंजूर डिझाइन थेट उत्पादन प्रक्रियेत रूपांतरित होत असून संपूर्ण प्रकल्पाचा मागोवा घेणेही शक्य होते.

# कलावारी चित्रकला स्पर्धेत ४२० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

## नगरसेविका कोमल नवले यांनी केले कौतुक



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कै. नारायणराव नवले प्राथमिक शाळा (मनपा शाळा क्र. ५६B), वडगाव खुर्द, पुणे येथे 'कलावारी' चित्रकला स्पर्धेचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर भक्तिमय वातावरणात आयोजित या स्पर्धेत इयत्ता पाचवी ते सातवीच्या तब्बल ४२० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, पालखी सोहळा, संत परंपरा, वारकरी संप्रदाय आदी विषयांवर आकर्षक व कल्पक चित्रे साकारली. संपूर्ण शाळा भक्तिरसात न्हाऊन निघाली असून विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेचे सुंदर दर्शन घडले. या उपक्रमाला पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका, शिक्षण समितीच्या सदस्य सौ .कोमल सारंग नवले यांनी विशेष उपस्थिती लावली. त्यांनी विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या चित्रांचे बारकाईने निरीक्षण करून त्यांच्या कल्पकतेचे मनापासून कौतुक केले. विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत त्यांनी शिक्षणासोबत कला, संस्कार आणि सर्जनशीलतेचे महत्त्वही अधोरेखित केले. तसेच शाळेची पाहणी करून शिक्षकांशी संवाद साधला, शाळेतील विविध अडचणी जाणून घेतल्या आणि आवश्यक सहकार्याचे आश्वासन दिले. प्रभारी मुख्याध्यापिका सुमन गंथडे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी झाल्याबद्दल प्रोत्साहन देत नगरसेविका कोमलताई नवले यांचे स्वागत व आभार मानले.

या स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन शाळेतील उत्साही शिक्षक श्री. गणेश पतंगे यांनी केले. त्यांना इयत्ता पाचवी ते सातवीच्या सर्व वर्गशिक्षकांनी मोलाचे सहकार्य केले. फलक लेखनाची जबाबदारी स्वाती पडवळ व रेशमा नवले यांनी सांभाळली, तर छायाचित्रण वैभव फटांगरे यांनी केले.

याप्रसंगी विजय कदम, साबळे, मनोहर थिटे, अनिता शितोळे, प्रियांका देवकुळे आणि शिल्पा यांनीही उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा 'कलावारी' हा उपक्रम अत्यंत उत्साहपूर्ण, प्रेरणादायी आणि संस्मरणीय वातावरणात संपन्न झाला.

## “कलावारी” शालेय चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे प्रथम सेवा वारी अंतर्गत आयोजित करण्यात आलेली “कलावारी” शालेय चित्रकला स्पर्धा आज नूतन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. महापौर मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये ३ जुलै रोजी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. ‘वारी’ या विषयावर विद्यार्थ्यांनी आकर्षक, कल्पक आणि संस्कृतीचे दर्शन घडवणारी चित्रे साकारत आपल्या



कलागुणांची प्रभावी छाप पाडली. विद्यार्थ्यांच्या चित्रांमधून वारकरी संप्रदाय, संत परंपरा, भक्तीभाव आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे सुंदर दर्शन घडले. यावेळी शाळेचे संचालक राजाराम डांगे, मुख्याध्यापिका सौ. प्रियांका गुजराती, साक्षी डांगे तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळत असल्याचे सांगितले. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची शान असलेल्या वारी परंपरेची माहिती मिळाली. तसेच आपल्या समृद्ध संस्कृतीची ओळख नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचा एक सुंदर आणि प्रेरणादायी प्रयत्न या स्पर्धेतून करण्यात आला.

## टाइप २ मधुमेही पुरुषांपैकी ६४ टक्क्यांना लैंगिक दुर्बलतेचा त्रास : पुण्यातील संशोधन

- रक्तातील साखरेसोबत मानसिक आणि लैंगिक आरोग्य तपासणीची गरज
- अमेरिकन डायबेटीस असोसिएशनच्या वैज्ञानिक परिषदेत संशोधन सादर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

टाइप 2 मधुमेह असलेल्या पुरुषांपैकी सुमारे 64 टक्के जणांना इरेक्टाइल डिसफंक्शन (लैंगिक दुर्बलता) असल्याचे पुण्यातील फ्रीडम फ्रॉम डायबेटीस क्लिनिकच्या संशोधकांनी केलेल्या अभ्यासातून समोर आले आहे. मधुमेहाच्या उपचारांमध्ये रक्तातील साखरेच्या नियंत्रणाबरोबरच मानसिक आणि लैंगिक आरोग्याची नियमित तपासणी आवश्यक असल्याचे या संशोधनातून अधोरेखित करण्यात आले आहे. 'प्रीव्हेलन्स अँड रिस्क फॅक्टर्स ऑफ इरेक्टाइल डिसफंक्शन इन मेन विथ टाइप 2 डायबेटिस इन रिअल-वर्ल्ड क्लिनिकल प्रॅक्टिस' हा अभ्यास ५ ते ८ जून २०२६ दरम्यान अमेरिकेतील न्यू ऑर्लिन्स येथे झालेल्या अमेरिकन डायबेटीस असोसिएशनच्या ८६व्या वैज्ञानिक अधिवेशनात सादर करण्यात आला.

## वृक्ष संवर्धन समितीवर कोमल नवले यांची निवड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या वृक्ष संरक्षण व संवर्धन समितीवर नगरसेविका सौ .कोमल सारंग नवले यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

महापालिकेच्या शिक्षण समितीच्या विद्यमान सदस्या असलेल्या कोमल नवले यांच्यावर आता वृक्ष संवर्धन समितीचीही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या निवडीमुळे शहरातील पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, हरित क्षेत्रांचे संरक्षण तसेच पर्यावरणपूरक उपक्रमांना अधिक चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

समितीच्या माध्यमातून शहरातील हरित क्षेत्र वाढविणे, वृक्षांचे जतन करणे आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रभावी काम करण्याचा आपला प्रयत्न राहील, अशी प्रतिक्रिया



नगरसेविका सौ.कोमल नवले यांनी आरंभपर्व ला दिली. या निवडीबद्दल केंद्रीय राज्यमंत्री तथा खासदार मुरलीधर मोहोळ, आमदार भीमराव तापकीर तसेच माजी नगरसेवक बाळासाहेब नवले यांच्यासह विविध मान्यवरांचे कोमल नवले यांनी आभार व्यक्त. नागरिकांचे आभार मानत, शहराच्या पर्यावरण संवर्धनासाठी समर्पितपणे काम करण्याची ग्वाही त्यांनी दिली आहे.

## बकोरी ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचाराविरोधात २३ ऑगस्टपासून अमरण उपोषण

### निकृष्ट विकासकामे, शासकीय निधीचा गैरवापर आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात चंद्रकांत वारघडे यांचा इशारा

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)** : माहिती सेवा समितीचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत गोविंद वारघडे यांनी मौजे बकोरी (ता. हवेली, जि. पुणे) ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचार, शासकीय निधीचा गैरवापर, निकृष्ट दर्जाची विकासकामे, पर्यावरण व आरोग्याशी संबंधित प्रश्न तसेच प्रशासनाच्या निष्क्रियतेच्या निषेधार्थ २३ ऑगस्ट २०२६ पासून जिल्हा परिषद, पुणे कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्याची घोषणा केली आहे. वारघडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले की, मागील अनेक वर्षांपासून ग्रामपंचायतीतील आर्थिक गैरव्यवहार, बोगस बिले, विकासकामांतील भ्रष्टाचार, अस्तित्वात नसलेल्या घरांच्या नोंदी, पाणीपुरवठा न करता पाईपलाईनच्या नावाखाली निधी खर्च झाल्याचे दाखविणे, सार्वजनिक जागेवर बेकायदेशीर मालकी मिळविण्याचा प्रयत्न आदी गंभीर अनियमिततांबाबत विविध विभागांकडे वारंवार तक्रारी व पुरावे सादर करण्यात आले. मात्र अद्याप कोणतीही निष्पक्ष चौकशी किंवा दोषींवर ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला. बकोरी येथील मशरूम कंपनीमुळे परिसरातील नागरिकांना पर्यावरणीय व आरोग्यविषयक त्रास होत असल्याच्या तक्रारी असूनही संबंधित विभागांनी प्रभावी कारवाई केली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच कंपनीकडून ग्रामपंचायतीला देय असलेल्या करांसह इतर आर्थिक व्यवहारांमध्येही अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याशिवाय वारघडे वस्ती ते बकोरी गाव या सुमारे दीड कोटी रुपयांच्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप करण्यात आला असून, यासंदर्भातील पुरावे सादर करूनही संबंधित ठेकेदारांना संरक्षण दिले जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. माहितीच्या अधिकाराखाली मागविलेली माहिती अपूर्ण देणे, चुकीची माहिती पुरविणे आणि तक्रारींकडे दुर्लक्ष करणे ही गंभीर बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले. या सर्व प्रकरणांची तालुक्याबाहेरील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून स्वतंत्र, निष्पक्ष व वेळबद्ध चौकशी करून दोषींवर भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, माहितीचा अधिकार अधिनियम तसेच इतर लागू कायद्यांनुसार फौजदारी व प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

> चंद्रकांत वारघडे यांनी इशारा दिला की, प्रशासनाने यापुढेही दुर्लक्ष केल्यास २३ ऑगस्टपासून अमरण उपोषण सुरू करण्यात येईल आणि न्याय मिळेपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही. तसेच ही लढाई केवळ बकोरीपुरती मर्यादित न राहता ग्रामपंचायत व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरोधातील व्यापक जनआंदोलनात रूपांतरित होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

## महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक ऐतिहासिक

### महिला शेतकऱ्यांच्या हक्कांना मिळणार कायदेशीर मान्यता : सुनेत्रा अजित पवार

- विधेयकाला विधानसभेत पाठिंबा
- महिला शेतकऱ्यांच्या सन्मान आणि हक्कांचा नवा अध्याय

**मुंबई / उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक-२०२६' हा केवळ कायदा नसून मातीत जीव ओतणाऱ्या प्रत्येक महिला शेतकऱ्याच्या श्रम, सन्मान आणि हक्कांना दिलेला ऐतिहासिक न्याय असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी विधानसभेत सांगितले. या विधेयकावरील चर्चेत सहभागी होत त्यांनी विधेयकाचे स्वागत करत त्याला पूर्ण पाठिंबा दिला.

सुनेत्रा पवार म्हणाल्या की, भारतात प्रथमच महाराष्ट्र विधानसभेत अशा स्वरूपाचे विधेयक मांडण्यात आले असून ते राज्यातील लाखो महिला शेतकऱ्यांच्या आयुष्यात परिवर्तन



घडविणारे ठरेल. शेती ही केवळ उदरनिर्वाहाचे साधन नसून संस्कृती, परंपरा आणि जीवनाशी जोडलेले नाते आहे. मात्र, शेतीतील सर्व कामांमध्ये खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या महिलांना आजपर्यंत अधिकृतपणे 'शेतकरी' म्हणून ओळख मिळाली नव्हती. हा ऐतिहासिक अन्याय दूर करण्याचे काम हे विधेयक करणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रत्यक्ष शेतीतील सहभाग हाच शेतकरीपणाचा निकष मानून महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे.

त्यामुळे महिलांना प्रथमच अधिकृत शेतकरी म्हणून ओळख मिळेल. कृषी योजना, पीक विमा, कर्ज, प्रशिक्षण, बाजारपेठ, कौशल्य विकास आणि विविध शासकीय योजनांचा लाभ घेणे अधिक सुलभ होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या विधेयकांतर्गत महिला शेतकरी डेटाबेस, महिला शेतकरी सक्षमीकरण कक्ष, सहाय्य अधिकारी, राज्यस्तरीय देखरेख समिती आणि महिला शेतकरी निधी यांसारखी संस्थात्मक व्यवस्था उभारण्यात येणार असल्याने हे केवळ घोषणांचे नव्हे तर प्रभावी अंमलबजावणीचे विधेयक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकामुळे जमिनीची मालकी, वारसा किंवा उत्तराधिकाराच्या कायद्यांमध्ये कोणताही बदल होणार नसून, महिलांच्या कृषी योगदानाला केवळ कायदेशीर मान्यता दिली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

महायुती सरकारने महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी विविध योजना राबवल्या असून महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक हा त्या प्रयत्नांचा पुढचा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे सांगत महाराष्ट्राने पुन्हा एकदा देशासमोर आदर्श निर्माण केल्याचा विश्वास सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला. तसेच या विधेयकाच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या मुख्यमंत्री, कृषी मंत्री आणि कृषी विभागाचे त्यांनी अभिनंदन केले.

## बीआरटी मार्ग टप्प्याटप्प्याने हटविण्यास सुरुवात

- पहिल्या टप्प्यात विश्रांतवाडी चौक ते परुळेकर शाळा परिसरातील ५०० मीटर बीआरटी मार्ग आणि साठे बिस्कीट बसस्थानक हटविले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे-आळंदी पालखी महामार्गावरील विश्रांतवाडी चौक ते फुलेनगर रोड दरम्यानचा बीआरटी मार्ग हटविण्यास स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानंतर महापालिका आयुक्तांची प्रशासकीय मंजुरीही प्राप्त झाली आहे. त्यानुसार बीआरटी हटविण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

विश्रांतवाडी चौक ते फुलेनगर रोड या सुमारे तीन किलोमीटर लांबीच्या बीआरटी मार्गावर एकूण सहा बीआरटी बसस्थानके आहेत. पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पहिल्या टप्प्यात विश्रांतवाडी चौक ते परुळेकर शाळा (शांतीनगर) दरम्यानचा सुमारे ५०० मीटर लांबीचा बीआरटी मार्ग तसेच साठे बिस्कीट बीआरटी बसस्थानक हटविण्यात आले आहे.

या कामामध्ये दोन्ही बाजूंचे सुमारे २५० मीटर लांबीचे आरसीसी लेन सेपरेटर, ७५० मीटर लांबीचे लोखंडी ग्रील सेपरेटर तसेच ३५



मीटर लांबी व ४ मीटर रुंदीचे बीआरटी बसस्थानक काढण्यात आले आहे. उर्वरित बीआरटी मार्ग हटविण्याचे कामही नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात येणार असून ते पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागामार्फत पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य अभियंता (पथ विभाग) यांनी दिली.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

# दै. आरंभ पर्वला जाहिरात देऊन तर पहा..!

## आपल्या व्यवसायाची भरारी, आमच्या प्रभावी प्रसिद्धीसह..!

आपल्या उत्पादनाची, सेवांची, संस्थेची, शैक्षणिक उपक्रमांची, व्यावसायिक प्रतिष्ठानांची किंवा शुभेच्छा जाहिरातींची प्रभावी प्रसिद्धी करण्यासाठी आजच निवडा **दैनिक आरंभ पर्व.**

- **कमी खर्चात** अधिक वाचकांपर्यंत पोहोच
- **शहर, उपनगर व** ग्रामीण भागात व्यापक प्रसार
- **आकर्षक मांडणी** आणि प्रभावी सादरीकरण
- **व्यावसायिक, सामाजिक व शासकीय** जाहिरातींसाठी विश्वासार्ह माध्यम
- **मुद्रित आणि डिजिटल** प्रसिद्धीची सुविधा

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

आपल्या यशाची सुरुवात योग्य प्रसिद्धीपासून...!

आजच जाहिरात द्या आणि आपल्या व्यवसायाला द्या नवी ओळख..!



दै. आरंभ पर्व
"जनतेच्या विश्वासाचे वृत्तपत्र"

जाहिरात विभागाशी संपर्क साधा

लक्ष्मण साबळे
पुणे निवासी संपादक

8605284272

आजची जाहिरात, उद्याची यशोगाथा..!



दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

पुणे प्रहार NEWS CHANNEL

## दैनिक आरंभ पर्व व पुणे प्रहार चॅनलसाठी

# संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार नेमणे आहे!



महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुका, जिल्हा आणि शहरातून प्रतिनिधी हवे आहेत.

## आपणही बना आमच्या टीमचा भाग !

### आम्हाला हवे आहेत :

**पात्रता**
मराठी भाषा उत्तम लिहिता-बोलता येणे आवश्यक.
पत्रकारितेचा अनुभव असणे प्राधान्य.

**कामाचे स्वरूप :**
बातम्या संकलन, लेखन, रिपोर्टिंग, फोटो/व्हिडिंओ कव्हरेज, स्थानिक घडामोडींचे वृत्तांकन.

**आम्ही देतो :**
ओळखपत्र, व्यासपीठ, मार्गदर्शन आणि योग्य मानधन.

**कार्य क्षेत्र :**
संपूर्ण महाराष्ट्र (जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण भाग)

**आमच्याशी जोडल्याने मिळेल :**

- विश्वसनीय वृत्तांकन
- व्यापक वाचकवर्ग
- नि:पक्ष व सकारात्मक पत्रकारिता
- प्रत्यक्ष घडामोडींवर अचूक नजर

बातमी आहे... तर आमच्यापर्यंत पोहोचवा! समाजाचा आवाज बना!

आपली ओळख करा... आपला आवाज बुलंद करा!

# संपर्क : 7276314142

आजच संपर्क साधा
आणि आमच्या टीममध्ये सहभागी व्हा!

# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

## आपल्या जाहिरातींसाठी विश्वासार्ह व्यासपीठ

शासकीय, निमशासकीय, बँकिंग व सार्वजनिक जाहिरातींसाठी प्रभावी माध्यम

**आपल्या संस्थेच्या सर्व प्रकारच्या अधिकृत जाहिराती आता प्रसिद्ध करा दैनिक आरंभ पर्व मध्ये – विश्वास, पारदर्शकता आणि व्यापक वाचकवर्ग असलेले प्रभावी माध्यम.**

### आम्ही प्रसिद्ध करतो :

- शासकीय जाहिराती ✓
- ग्रामपंचायत जाहिराती ✓
- निविदा / टेंडर नोटीस ✓
- जाहीर नोटीस ✓
- बँकांचे ताळेबंद व लिलाव सूचना ✓
- सहकारी संस्था जाहिराती ✓
- शैक्षणिक संस्था सूचना ✓
- कोर्ट / कायदेशीर नोटीस ✓
- सार्वजनिक सूचना व प्रसिद्धीपत्रके ✓
- व्यवसायिक व व्यापारी जाहिराती ✓

### का निवडाल दैनिक आरंभ पर्व?

- ग्रामीण व शहरी भागात प्रभावी पोहोच
- कमी दरात उत्तम प्रसिद्धी
- जलद व अचूक प्रकाशन सेवा
- विश्वासार्ह आणि लोकप्रिय माध्यम
- डिजिटल व प्रिंट दोन्ही प्लॅटफॉर्मवर प्रसिद्धी




आपल्या जाहिराती अधिकधिक लौकांपर्यंत पोहोचवण्यासाठी

## आजच संपर्क साधा!

संपर्क : प्रतिक गंगणे
7276314142
8657865702

ई-मेल : aparvinfo@gmail.com

दैनिक आरंभ पर्व | “आपल्या विश्वासाचे वृत्तपत्र”